ले. कर्नल रा. रा. जाधव (निवृत्त)
प्रभारी संचालक

महाराष्ट्र
सत्यमेव जयते
शासन

सैनिक कल्याण विभाग
महाराष्ट्र राज्य,
'रायगड', राष्ट्रीय युद्ध स्मारकासमोर,
घोरपडी, पुणे - ४११ ००१.
दूरध्वनी : ०२० - २६३०२६०१
ई-मेल : dir.dsw@maharashtra.gov.in

क्रमांक :१६३५३/कास्मृदि/सैकवि-१६

दिनांक : 22 जुलै २०२२

प्रिय श्री: संकेत,

शहीद सैनिकांच्या बलिदानाची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दिनांक २६ जुलै २०२२ रोजी २३ वा कारगिल विजय दिवस सैनिक कल्याण विभाग, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमामध्ये स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधुन शहीद सैनिकांच्या वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता तसेच अपंग जवान यांना आपण स्वत: **"एक इंडिया मिशन रिंग"** सन्मानपुर्वक बहाल करुन एका राष्ट्रीय कार्यास हातभार लावला त्याबद्दल मी आपले आभार मानतो व आपणास धन्यवाद देतो.

एकता आणि विविधता म्हणून भारतातील सर्व राज्यामधून माती एकत्रित करुन चांदी आणि सोन्याचा वापर करुन बनविलेली ही रिंग सैनिकास हिरा समजले आणि त्यांना बहाल केली त्याबद्दल आपला शतश: आभारी आहे.

मातृभूमीच्या रक्षणासाठी सैनिक आत्मबलिदान करतात याचा सर्वांना सार्थ अभिमान आहेच. परंतु भारतीय लष्करात भरती होऊन मातृभुमीची सेवा करीत असतांना आपले सैनिक उन, वारा, पाऊस, बर्फ यापासुन होणा-या त्रासाची पर्वा न करता फक्त आपल्या देशवाशीयांची सेवा म्हणून सीमेवर डोळयात तेल घालुन देशाचे रक्षण करीत असल्यामुळे आज आपले भारतीय नागरीक शांतपणे झोप घेऊ शकतात व याची आपणास निश्चितच जाण असल्याची प्रचिती आपण आज या सन्मान सोहळा कार्यक्रमामध्ये दाखवून दिली.

आपण स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये अशा प्रकारच्या ७५०० रिंग शहीद जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, सैनिक आणि माजी सैनिक यांना सन्मानपुर्वक बहाल करणार आहात. तरी आपल्या या कार्यास शतश: नमन करतो व पुन:श्च एकवार आपले आणि आपल्या बोनिसा वर्ल्डचे आभार व्यक्त करतो.

यापुढे सुध्दा आपल्याकडून असेच राष्ट्रकार्य घडत राहो ही सदिच्छा !

आपला स्नेहांकित,

Jadhav

**(ले.कर्नल राजेंद्रकुमार रा. जाधव (निवृत्त)**
**प्रभारी संचालक**

प्रति,
श्री. संकेत बी. बियाणी
संस्थापक बोनिसा वर्ल्ड
पुणे-४११ ०३०